नेहरू बाल पुस्तकालय

आ. वा.
२९३९
3913|९४

# ता न से न

## अद्भुत संगीतकार

लेखक

**अशोक दावर**


मराठी अनुवाद

सुनंदा देशपांडे, दातार

बाल वाङ्मय विभाग.
२९३९ 3913|९४
आ. वा.

BVBK-0402939

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया


Davar


भारत देशाच्या मध्यभागी ग्वाल्हेर नावाचे एक शहर वसलेले आहे. ह्या शहरात तानसेन नावाच्या एका थोर, अलौकिक संगीतसम्राटाची समाधी आहे.

सुंदर कोरीवकाम केलेल्या ह्या दगडी समाधीजवळच छोटसं चिंचेचं झाड आहे. ह्या चिंचेच्या झाडाचं एक पान खाल्ल्यानं आणि समाधीला स्पर्श केल्यानं गायकाचा आवाज सुधारतो, अशी एक समजूत आहे.

तानसेन हा संगीतक्षेत्रातील जणु कांही एक जादुगारच होता. आजही पुष्कळ प्रसिध्द गायक तानसेननं निर्माण केलेल्या गायन परंपरेचं अनुकरण करतात. या परंपरेला ग्वाल्हेर घराण्याची गायकी म्हणतात.


बाल वाङ्मय विभाग.
२९३९ ३१।३।९४
बा. वा.

BVBK-0402939




सुमारे ४०० वर्षांपूर्वी, ग्वाल्हेर जवळच्या एका छोट्या खेड्यांत, मुकुंद मिश्र नावाचे एक धनाढ्य कवी आपल्या बायकोसह राहात होते. त्यांना मूलबाळ नव्हतं, हेंच त्यांचं दुःख होतं. एका मित्राच्या सांगण्यावरून मिश्र ग्वाल्हेरचे एक प्रसिध्द संत आणि गायक महंमद घोस यांचेकडे त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गेले. या संताने त्यांच्या दंडाला एक पवित्र ताईत बांधला व तुला मुलगा होईल असा आशिर्वाद दिला. त्याप्रमाणे खरोखरच त्याला कांही दिवसांनी मुलगा झाला. त्याचे नांव तानसेन असे ठेवले.

तानसेन मोठा होऊ लागला. त्याला लिहिणे-वाचणे शिकवण्यासाठी त्याच्या वडिलांनी एका शिक्षकाची नेमणूक केली. परंतु तानसेनला शिकण्यापेक्षा, आपल्या सवंगड्यांसह रानावनात भटकायला जास्त आवडे. तिथं तो पशुपक्ष्यांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करी.

एकदा काय झालं, एक गायकवृंद त्या वनांतून जात होता. तानसेन एक झुडुपाआड लपला आणि त्यानं वाघासारखी डरकाळी मारली.ती डरकाळी ऐकून ते सारे जिवाच्या भीतीने अर्धमेले झाले. जेव्हां हा छोटा तानसेन त्यांच्या समोर आला, तेव्हां त्याला पाहून त्यांच्या नेत्याने, त्याचं, वाघासारखी हुबेहूब डरकाळी मारली म्हणून कौतुक केलं, तो पशुपक्ष्यांसारखे आवाज काढू शकतो याचं त्यांना फारच आश्चर्य वाटलं.


त्या गायकवृंदाचा नेता तानसेनवर खुष झाला. तो नेता दुसरा तिसरा कोणी नसून प्रसिध्द संगीत शिक्षक हरिदास होते.


सा रे ग म प ध नि सा
Davar

तानसेनमधली संगीताची सूप्त प्रतिभा ओळखून, हरिदास तानसेनच्या वडिलांकडे गेले, आणि त्यांनी, ''तानसेनला आपला शिष्य म्हणून पाठवावा'' अशी त्याच्या वडिलांना विनंती केली. मोठ्या नाखुषीनंच, तानसेनच्या आईनं आपल्या एकुलत्या एका मुलाला, हरिदासांबरोबर वृंदावनाला संगीत शिकायला जायची परवानगी दिली.

जवळ जवळ १० वर्षे, तानसेनने हरिदासांकडून संगीताचे धडे गिरवले. ''सा-रे-ग-म-प-ध-नी-सा'' या संगीताच्या मुळाक्षरांपासून सुरुवात करून तानसेन गायला आणि तानपुरा वाजवायला शिकला. हिंदुस्तानी संगीताचे विविध राग आणि रागांचे बारकावे त्याने आत्मसात केले.

संगीत तुम्हाला एवढा आनंद देऊं शकतं की ते ऐकून तुम्ही आनंदानं नाचाल किंवा गंभीर रागांच्या सुरावटीनं तुमच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतील.



एके दिवशी तानसेनचे वडील खूप आजारी आहेत, असा त्याला निरोप मिळाला. जेव्हां तानसेन घरी पोहोचला तेव्हां खरोखरच त्याचे वडील मृत्यूशय्येवर असलेले त्याला दिसले.

"तू संगीतकार झालास याचाच मला खूप आनंद झाला. संत महंमद घोस यांना जाऊन भेट." हेच त्याच्या वडिलांचे शेवटचे शब्द होते.

त्यानंतर आईकडे बघण्यासाठी म्हणून तानसेन कांही दिवस घरीच राहिला, पण वर्षाच्या आंत त्याची आई पण वारली.

वडिलांच्या इच्छेप्रमाणे आता, महंमद घोस यांचेकडे जाऊन पुढचं शिक्षण घ्यायला त्याला कसलीही आडकाठी नव्हती, पण हिंदुस्तानी संगीताचा त्याने अभ्यास केलेला असल्यामुळे नवीन गुरुकडे जाण्यापूर्वी तानसेन आपल्या पहिल्या गुरुकडे म्हणजे हरिदासांकडे त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गेला.

"तुझ्या वडिलांची इच्छा पुरी करणे हे तुझे आद्य कर्तव्य आहे. तू मला माझ्या मुलाप्रमाणेच आहेस, तेव्हां तू इथं केव्हांही येऊ शकतोस" असं म्हणून हरिदासांनी त्याला आशीर्वाद दिला.



Davar

महंमद घोस यांचेकडे तानसेननं तीन वर्षे संगीताचा अभ्यास केला व आपल्या उपजत संगीत कलेचा जास्त विकास केला.

दरम्यान महंमद घोस यांनी ग्वाल्हेरच्या राजाशी तानसेनची ओळख करून दिली. त्या दोघांची छान मैत्री जमली. तानसेन वरचेवर ग्वाल्हेरच्या राजवाड्यात जाऊ लागला, तिथं त्याला इतरही अनेक गायकांचं संगीत ऐकायची संधी मिळू लागली.

अशाच एका भेटीत, तिथल्या राजाकडं येणाऱ्या एका सुंदर स्त्रीची, हुसानीची आणि तानसेनची ओळख झाली. हुसानी खरोखरच अप्रतीम सुंदर, लावण्यवती होती. तानसेन तिच्या प्रेमांत पडला आणि नंतर त्यानं तिच्याशी विवाह केला.


नंतर कांही वर्षातच, महंमद घोस वारले, पण त्यांनी आपली सर्व संपत्ती, मालमत्ता तानसेनला दिली. तानसेन महंमद घोस यांच्या घरातच राहू लागला. आणि तिथंच त्याचा भाग्योदय झाला.


Davar

एके दिवशी ग्वाल्हेर जवळ असलेल्या रेवाच्या दरबारातून एक राजदूत आला, त्यानं दरबारातून आणलेलं आज्ञापत्र दाखवलं.

रेवाचा राजा रामचंद्र याने तानसेनला आपल्या दरबारी संगीतकार म्हणून बोलावलं होतं.

हा तानसेनचा फार मोठा सन्मान होता, त्याच्या भाग्योदयाचं पहिलं पाऊल होतं.


Davar


तानसेनच्या संगीताची राजा रामचंद्रने खूप प्रशंसा केली, आणि त्याच्यावर मूल्यवान वस्तूंचा वर्षाव केला. एकदा तर त्यानं तानसेनला हजार सुवर्णमुद्रा बहाल केल्या.

नंतर कांही दिवसांनी सम्राट अकबर रेवाला भेट द्यायला आला, त्यावेळी राजा रामचंद्रानं आपल्या सन्माननीय पाहुण्याच्या मनोरंजनासाठी तानसेनची नेमणूक केली.

त्यावेळी तानसेनचं स्वर्गीय संगीत ऐकून सम्राट अकबर खूपच प्रभावित झाला आणि राजधानीला परतल्याबरोबर त्यानं, "तानसेनला राजदरबारात पाठवावं", अशी राजा रामचंद्राकडे मागणी केली.


तानसेनला आपल्यापासून दूर पाठवायची कल्पनासुध्दा राजा रामचंद्राला सहन होत नव्हती, पण राजाज्ञेचा अवमान करून अकबरासारख्या बलाढ्य सम्राटाचा राग ओढवून घेणं त्याला मान्य नव्हतं. कारण किती झालं तरी रामचंद्र हिंदुस्तानच्या आधिपत्याखाली असलेल्या एका छोट्याशा राज्याचा राजा होता.

शेवटी नाईलाजाने राजा रामचंद्रानं, तानसेनला शाही इतमामात आपल्या दरबाराची भेट म्हणून अत्यंत सूरक्षिततेत अकबराच्या दरबारात पाठवलं.


Davar

आणि तानसेन आग्ऱ्याला पोहोचला. राजधानी, आग्ऱ्यांत तानसेनचं भव्य स्वागत झालं. अकबर तानसेनच्या संगीतानं एवढा मोहित झाला होता की, त्यानं तानसेनचा अंतर्भाव, त्यावेळच्या सर्वश्रेष्ठ, बुध्दिमान अशा नवरत्नात केला.


शाही दरबार संपल्यानंतर, तान्सेन फक्त सम्राटासाठी गात असे, रात्रीच्यावेळी दिवस भराचा शीण घालवून सम्राट अकबराला शांत झोप लागत असे, आणि सकाळी उठवण्यासाठी व उठल्यावर प्रसन्न ताजेतवाने वाटेल असेच राग तानसेन नेहमी गात असे.


Davar

तानसेनच्या संगीताचा प्रभाव वर्णन करणाऱ्या अनेक कथा सांगण्यात येतात. जेव्हां तानसेन गायला बसत असे तेव्हा सारे पशुपक्षी त्याचं गाणं ऐकायला जमत असत.

एकदा सम्राट अकबर शिकारीला गेला होता. तिथं एक पांढरा शुभ्र हत्ती त्याच्या नजरेत भरला, तो हत्ती स्वतःसाठी असावा असं त्याला वाटलं. म्हणून त्यानं तो हत्ती पकडून आणण्याचा सेवकांना हुकूम दिला. राजाज्ञाच ती... सेवकांनी लगेच तो पांढरा हत्ती पकडला आणि राजवाड्यात आणला. साखळदंडांनी बांधल्यामुळे तो हत्ती भयंकर चवताळला... कुणालाही ऐकेना.


तानसेननं जेव्हा हे ऐकलं, तेव्हां तो त्या साखळदंडांनी जेरबंद केलेल्या, चवताळलेल्या हत्ती जवळ गेला आणि त्यानं तानपुरा छेडून गायला सुरुवात केली. त्याच्या संगीताच्या जादूने हळू हळू तो हत्ती शांत झाला आणि मगच, सम्राट अकबर त्याच्यावर स्वार होऊ शकला.


Davar

सम्राट अकबरानं सुध्दा तानसेनला भरपूर भेटी दिल्या, मान सन्मान दिला. शाही महालाजवळच तानसेनला एक मोठा वाडा दिला गेला.

एके दिवशी संध्याकाळी सम्राट अकबरानं तानसेनला भेटायचं ठरवलं, आणि तो तानसेनच्या घरी गेला. सम्राट जेव्हा तिथं पोहोचला तेव्हां तानसेनची गानसमाधी लागली होती. सम्राट तिथंच सज्जात बसला, आणि तानसेनची गानसमाधी भंग न करता त्यानं तानसेनचं गाणं ऐकलं

त्या स्वर्गीय सुरांनी सम्राट इतका खुष झाला की, त्यानं आपल्या गळ्यातला हिऱ्याचा कंठा काढून तानसेनला बक्षिस दिला.


Davar


ही वार्ता साऱ्या शहरात पसरली. सम्राटानं तानसेनचा एवढा मोठा सन्मान केलेला पाहून दरबारातल्या कांही लोकांना तानसेनचा मत्सर वाटू लागला. तानसेनला कसं तोंडघशी पाडता येईल याचाच ते कट करू लागले.

त्यांनी, सम्राटानं तानसेनला दिलेला हिऱ्याचा कंठा चोरला, आणि सम्राटाच्या कानात वीष ओतलं की,"महाराज आपण एवढा मौल्यवान कंठा तानसेनला दिलात, पण पैशाच्या लोभाने तानसेनने तो कंठा भारी किंमत घेऊन विकला, म्हणजे एका परीनं आपला अपमानच केलाय".

सम्राटाला राग आला, मागचा पुढचा कसलाही विचार न करता, सम्राटाने, तानसेनला तो कंठा दरबारात हजर करावा असा हुकूम केला. तानसेन तो कंठा दरबारात हजर करू शकला नाही.

सम्राटाला भयंकर संताप आला आणि संतापून सम्राटानं गर्जना केली, "तानसेन, जोवर तू तो हिऱ्याचा कंठा दरबारात पेश करू शकत नाहीस, तोवर तू दरबारात उपस्थित राहूं शकत नाहीस, तो कंठा घालूनच तू दरबारात उपस्थित व्हायला हवंस"

२९३९ २७/३/९८
बा. वा.


Davar

अशा तऱ्हेनं तानसेनचा अपमान करून त्याला दरबारातून हद्दपार केलं. त्याला कुठंही तोंड दाखवायला जागा राहिली नाही, काय करावं त्याला कांही सुचेना आणि एकदम त्याला राजा रामचंद्रांची आठवण झाली. आणि तो राजा रामचंद्रांकडे जावे म्हणून रेवाला जायला निघाला.


आपल्या दरबारच्या पूर्वीच्या संगीतकाराचं राजा रामचंद्रानं हार्दिक स्वागत केलं. तानसेनच्या तोंडून, त्याच्या अपमानाची सारी हकिगत त्यानं ऐकली, आणि तो तानसेनला म्हणाला, "ठीक आहे, कसलीही चिंता करुं नकोस, आतां तू फक्त माझ्यासाठीच गा"

तानसेनने दोन अतिशय सुरेख राग त्याला ऐकवले. "शाब्बास, तानसेन, तुझ्या गायनातली गोडी आणखीनच वाढलीय" ऊस्फूर्तपणे तो म्हणाला, "तू माझा आनंद द्विगुणत केलास". असं म्हणून त्यानं आपल्या पायातल्या हिरेजडीत खडावा तासेनला बक्षिस दिल्या.

तानसेन त्याच पावली आग्ऱ्याला परत आला, त्याने त्या हिंरेजडित खडावा सम्राटाच्या समोर ठेवल्या आणि म्हणाला, "महाराज माझ्या हातून आपल्या कंठ्यातले जेवढे हिरे हरवले असतील तेवढे या हिरे जडीत खडावातून काढून घ्यावेत आणि मला क्षमा करावी."

त्या हिरेजडीत खडावा सम्राटाच्या कंठ्यापेक्षा जास्त मौल्यवान होत्या. आपण तानसेनला ओळखण्यात फार मोठी चूक केली हे सम्राटाच्या लगेच लक्षांत आलं आणि तो तानसेनला म्हणाला,

"तानसेन, तुझं संगीत या सर्वापेक्षा जास्त श्रेष्ठ आणि मौल्यवान आहे, तेच माझे खरे हिरे होत, आता या पुढं तुझ्या बद्दल असा घाणेरडा संशय मी कधीही घेणार नाही. तू माझ्या दरबारचा शाही संगीतकार म्हणून सन्मानाने परत दरबारात ये."



Davar

तानसेनची कीर्ती वाऱ्यासारखी सर्वदूर पसरली. हजारो वर्षात तानसेनसारखा संगीतकार झाला नाही, होणार नाही असं लोक म्हणू लागले. परत एकदा तानसेनच्या शत्रूंनी डोकं वर काढायला सुरुवात केली. ते मत्सरानं जळू लागले. तानसेनला खाली पाडण्यासाठी कारस्थान करू लागले. त्यांनी परत सम्राटाचे कान फुंकले, "सम्राटांनी आपल्यासाठी, तानसेननं दीपक राग आळवावा असं तानसेनला सांगावं!"

दीपक राग हा कठीण रागांपैकी एक राग आहे, शिवाय हा राग जर योग्य तऱ्हेने आळवला गेला तर या रागाच्या प्रभावाने उष्णता निर्माण होऊन दिवे तर आपोआप प्रज्वलित होतातच, पण गाणाऱ्याच्या शरीरात एवढी प्रचंड उष्णता निर्माण होते की गाणारा जळून खाक होतो.

अकबरानं जेव्हां तानसेनला 'दीपक' राग आळवायला सांगितला, तेव्हां तानसेनने सम्राटाला समजावयाचा खूप प्रयत्न केला की, "दीपक राग आळवणं म्हणजे गाणाऱ्यानं स्वतःला आगीत झोकून देण्यासारखं आहे." पण सम्राट त्याचं म्हणणं ऐकूनसुध्दा घ्यायला तयार होईना.


"तू जर खराखुरा मोठा संगीतकार असशील तर तू हे आव्हान स्वीकारायलाच हवंस" सम्राट अकबर म्हणाला.


Davar

दीपक राग आळवणं फार धोक्याचं आहे, याची तानसेनला पुरेपूर कल्पना होती आणि मेघ राग आळवला तर पाऊस येतो हेही तानसेनला माहीत होतं. त्याच वेळी जर कोणी मेघ राग आळवला तर दीपक रागानं भडकलेल्या अग्निज्वाळा शांत होतील हे ही तो जाणून होता.


आपल्या वाड्याच्या बागेत फिरता फिरता त्याच्या मनात विचार आला, पण एकाच वेळी दोन्ही राग मी कसे गाऊ? काय करावं बरं? तो विचार करू लागला. एकाएकी त्याला एक कल्पना सुचली. गुरुवर्य हरिदासांच्या चरणी जिनं आपलं जीवन अर्पण केलय ती त्यांची शिष्या रुपा, त्याच्या बरोबरीनं मेघराग तेवढ्याच ताकदीनं आळवूं शकेल.

गुरु हरदासांच्या परवानगीनं रुपा त्याच्या बरोबर मेघ राग गायला तयार झाली. रूपासुध्दा फार मोठी संगीतकार होती. रूपाला तयारी करण्यासाठी तानसेनने अकबराकडून पंधरा दिवसांची मुदत मागून घेतली. दोन आठवड्यानंतर तितक्याच ताकदीनं मेघ राग गाण्याची रुपाची तयारी झाली.



गाण्याचा दिवस उगवला. त्या दिवशी शाही दरबार, शाही पाहुणे आणि प्रजाजन यांनी खच्चून भरला होता. खूप लांबून लांबून लोकं तानसेनचं दिव्य संगीत ऐकायला, दीपक रागासारखा अवघड राग तानसेन कसा गातो ते पाहायला जमले होते.


भिंतीवर अगणित दिवे लावले होते, हातात तानपुरा घेऊन तानसेन गाण्यासाठी सज्ज झाला होता. सम्राट अकबरांच्या आगमनाची वाट पाहात होता. सम्राटाचं आगमन झालं, आणि ते आपल्या सिंहासनावर स्थानापन्न होताच त्या श्रेष्ठ संगीतकारानं तानपुरा छेडला आणि आलाप घेऊन दीपक राग आळवायला सुरुवात केली.




जसजशी तानसेननं दीपक राग आळवायला सुरुवात केली, तसतशी आजूबाजूची हवा गरम होऊ लागली.

त्याचं गाणं ऐकण्यासाठी, जमलेल्या लोकांना तिथल्या उष्णतेनं घाम येऊं लागला. बागेतल्या झाडांची पानं, फुलं करपू लागली, झाडं लाकडा सारखी वाळून कोळसा झाली. कारंज्यातलं पाणी अुकळू लागलं. त्या आगीच्या उष्णतेपासून स्वतःला वाचवण्यासाठी पक्षी झाडावरुन ऊडून जाऊ लागले. आणि बघता बघता दरबारातले सारे दिवे एका मागोमाग एक प्रज्वलित होऊ लागले. दरबारातल्या लोकांची उत्सुकता नाहीशी होऊन त्यांना आता भीती वाटू लागली.

सम्राट हातात गुलाबाचं फूल घेऊन गाणं ऐकत होता ते फूलही करपून गेलं आणि त्याच्या हातून गळून पडलं. सम्राट आपल्या आसनावरुन उठून उभा राहिला, इतकं ते सिंहासन सुध्दां गरम झालं होतं.


Dana

आता तानसेनचं अंगसुध्दा ताप आल्यासारखं गरम होऊन भाजूं लागलं. तरीही शांतचित्तानं तानसेन दीपक राग गातच राहिला. तानसेनची ही भयंकर अवस्था पाहून रूपाला काळजी वाटू लागली, पण तिच्या तोंडून शब्दच फुटेना. पण हळू हळू तिचं मन स्थिर झालं आणि तिच्या तोंडून मेघरागाचे आलाप निघूं लागले. जसजसा तिच्या आवाजातला दमदारपणा वाढू लागला तसतसे आकाशात काळे ढग जमूं लागले आणि बघता बघता जलधारा धरणीवर कोसळू लागल्या. कित्येक लोक दरबारातून उठून आपल्या अंगाची आग शमवायला बाहेर पावसात भिजायला धावले.



Davar

तप्त झालेलं वातावरण हळूं हळूं शांत होऊं लागलं. तानसेनचं बुध्दिकौशल्य पाहून लोकं आनंदून नाचूं लागली, त्यांनी तानसेनवर कौतुकाचा वर्षाव केला. सम्राटालाही खूप आनंद झाला.

आपण एका थोर संगीतकाराला आगीच्या ज्वाळात फेकत होतो याची कल्पना आली. आज आपण नाहक, एका श्रेष्ठ संगीतकाराला त्याच्या स्वतःच्याच गाण्यानं मुकलो असतो याची जाणीव होऊन धक्काच बसला.

तानसेनची कीर्ती दीपक रागाच्या ज्वाळांसारखी दिगंत पसरली.

दीपक रागाच्या गायनाने निर्माण झालेला तानसेनच्या अंगाचा दाह मात्र सहजासहजी शमला नाही. तानसेन आजारी पडला. इतका की त्याला बरं व्हायला दोन महिने लागले. दोन महिन्यानंतरच तो दरबारात हजर राहू शकला.



त्यानंतर मात्र कैक वर्षे तानसेन सम्राट अकबराच्या दरबारात गात राहिला – शिकवत राहिला. तानसेन फक्त संगीततज्ञ नव्हता तर कवीसुध्दा होता. त्यानं स्वतःच्या संगीताबद्दल खूपसं लिहिलं आणि नवे नवे राग निर्माण केले.

तानसेनच्या मृत्यूसमयी सम्राट अकबर त्याच्याजवळच होता. सम्राटाला त्याच्या मृत्यूचं अतिशय दुःख झालं. हिंदुस्तान, एका श्रेष्ठ संगीतकाराला आणि गायकाला मुकला याची त्याला जाणीव झाली. पण तानसेनचं संगीत मात्र गुरुंकडून शिष्यांकडे या रुपाने अमर राहिलं.

अजूनही दरवर्षी ग्वाल्हेरजवळच्या तानसेनच्या त्या समाधीजवळ संगीत संमेलन भरतं. भारतातल्या सर्व भागांतून मोठे मोठे संगीतकार इथं येऊन गातात आपली हजेरी लावतात आणि तानसेनला आपली आदरांजली अर्पण करतात.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. क्र. २९३९ दिनांक ३१/३/९४
विषय गो.मा. क्र.... .....

BVBK-0402939